**SNDT Women's University**
1, Nathibai Thackersey Road,
Mumbai 400 020
Phone: +91 22 2203 1879
Fax: +91 22 2201 8226

श्रीमती ना. दा. ठाकरसी विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग
मुंबई ४०० ०२०
Telegram: UNIWOMEN
Website: sndt.ac.in

जावक क्र. विशेष कक्ष/अ-४०/२०२०-२१/ २२.

दि. २९/१०/२०२०

# परिपत्रक

विषय : विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संचलित व संलग्न महाविद्यालयांतील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना दिलेल्या प्रवेशासंबंधात अनुसरलेल्या कार्यपद्धतीच्या अनुषंगाने अनुपालन अहवाल मिळणेबाबत...

संदर्भ : १) विद्यापीठाचे परिपत्रक जा. क्र. विशेष कक्ष/अ-३९/२०१९-२०/२९, दि. २४/०४/२०१९
२) विद्यापीठाचे शुध्दीपत्रक जा. क्र. विशेष कक्ष/अ-३९/२०१९-२०/८२, दि. १२/०७/२०१९
३) विद्यापीठाचा मेल जा. क्र. विशेष कक्ष/अ-३९/२०१९-२०/१०७, दि. ०३/०९/२०१९

महोदया/महोदय,

कृपया उपरोक्त विषयांकित संदर्भीय परिपत्रकं पाहावीत. सदर परिपत्रकांन्वये, विद्यापीठ शैक्षणिक विभाग, संचलित व संलग्न महाविद्यालयांतील अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना द्यावयाच्या प्रवेशासंबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती कळविण्यात आलेली आहे. सदर परिपत्रकांच्या अनुषंगाने खालील मुद्दांबाबतचा शैक्षणिक वर्ष २०२०-२१ चा अनुपालन अहवाल विद्यापीठाच्या विशेष कक्षाला तात्काळ पाठविण्यात यावा.

१. आपल्या महाविद्यालय/विभागात कोणकोणते अभ्यासक्रम शिकवले जातात ? त्यापैकी कोणते अभ्यासक्रम अनुदानित व कोणते विना-अनुदानित आहेत ? ते नमूद करावे.

२. आपल्या महाविद्यालय/विभाग अंतर्गत चालविण्यात येणा-या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी, कोणत्या प्रिंट व इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती ? (जाहिरातीचे कात्रण सोबत जोडावे) अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी जाहिरात प्रसिध्द केली नसल्यास, त्याची कारणे नमूद करावीत.

३. प्रवेश नियंत्रित करण्यासाठी 'प्रवेश समिती' गठित केली होती का ? नसल्यास कारणे नमूद करावीत.

४. प्रवेश समिती गठित केली असल्यास, खालील तक्त्यात माहिती उपलब्ध करून दयावी.

| अ.क्र. | समिती | संबंधीतांची नावे | पदनाम | सही व दुरध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|
| १. | अध्यक्ष | | | |
| २. | सदस्य | | | |
| ३. | सदस्य | | | |
| ४. | सदस्य | | | |
| ५. | मागासवर्ग प्रतिनिधी | | | |

५. प्रवेश समितीवर कार्य करताना, मागासवर्गीय प्रतिनिधीस काही अडचणी आल्या आहेत का ?

६. मागासवर्गीय प्रतिनिधीस आरक्षण धोरण संबंधाने विविध प्रश्नांची जाण आहे का ?

७. मागासवर्ग प्रतिनिधीने काही शेरे नमूद केले आहेत काय ? असल्यास त्याची प्रत उपलब्ध करून दयावी.

८. एकंदरीत प्रवेश पध्दती संदर्भात अध्यक्षांचा अभिप्राय काय आहे ?

९. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये प्रवेशासाठी विद्यार्थ्यांचे प्राप्त झालेले अर्ज आणि प्रत्यक्षात दिलेले प्रवेश याबाबतची सांख्यिकीय माहिती सोबतच्या तक्त्यामध्ये उपलब्ध करून दयावी.

१०. ज्या संस्थेची एकापेक्षा जास्त महाविद्यालये आहेत त्यांनी प्रत्येक महाविद्यालयाचा अनुपालन अहवाल स्वतंत्रपणे तयार करावा.

कृपया सदर अहवाल विद्यापीठाच्या विशेष कक्षाचे उपकुलसचिव यांना (specialcell@sndt.ac.in या ई-मेलवर) दि. १५ नोव्हेंबर, २०२० पर्यंत विनाविलंब पाठवावा.

कळावे.

आपला,

dg 29/10/2020

(डॉ. दिपक देशपांडे)
कुलसचिव,
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई

**प्रती,**
विद्यापीठाचे सर्व शैक्षणिक विभागप्रमुख,
विद्यापीठ संचलित सर्व महाविद्यालय/इंस्टिटयुट/सेंटर/संस्थेच्या प्राचार्या/प्राचार्य/संचालक,
विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्या/प्राचार्य,

## तक्ता

## प्रवेश समिती अहवाल शैक्षणिक वर्ष २०२०-२१

महाविद्यालय/विभागाचे नांव व पत्ता : ______________________________

दुरध्वनी क्रमांक : ______________________________ ई-मेल : ______________________________

संस्थेचे नाव व पत्ता : ______________________________

दुरध्वनी क्रमांक : ______________________________ ई-मेल : ______________________________

अंतिम प्रवेश समितीचा दिनांक व वेळ : ______________________________

| अ. क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | एकूण प्रवेश क्षमता | विद्यार्थ्यांच्या प्राप्त अर्जांची आकडेवारी/संख्या (No. of students applied) | | | | | | | | | | | प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची आकडेवारी/संख्या (No. of students admitted) | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | खुला | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | सा.शै. मा.व. | आ.दु. घटक | एकूण | खुला | अनु. जाती | अनु. जमाती | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | सा.शै. मा.व. | आ.दु. घटक | एकूण |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

**टिप :** वरील तक्त्यामध्ये दर्शविलेले आरक्षणाचे प्रवर्ग हे महाराष्ट्र राज्यातील महाविद्यालयांसाठी आहेत. महाराष्ट्र राज्याव्यतिरीक्त अन्य राज्यांतील विद्यापीठ संलग्न महाविद्यालयांनी आपल्या संबंधीत राज्य शासनाच्या प्रवेशासंबंधातील आरक्षण धोरणाप्रमाणे, आरक्षणाच्या प्रवर्गांमध्ये योग्य तो बदल करून माहिती तयार करावी.

प्राचार्य/प्रभारी/विभागप्रमुख यांची सही व शिक्का